जा.क्र.प्रा.ना.सं.कें./जवसंनि /1259/२०२२
प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र, भाटये
दिनांक : 14 NOV 2022

प्रति,

............................................

............................................

**विषय :–** कार्यालयीन निरूपयोगी जडवस्तू खरेदी करणेचे दरपत्रक देणेबाबत..........

महाशय,

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी, अंतर्गत प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र, भाटये, जि. रत्नागिरी येथील कार्यालयीन निरूपयोगी जडवस्तूची विक्री **दि. ०६/१२/२०२२** रोजी करण्यात येणार आहे. सदर बाबतची सिलबंद दरपत्रके दि. ०५/१२/२०२२ रोजी सकाळी १०.३० वाजेपर्यंत कार्यालयात स्विकारण्यात येतील. दरपत्रके विक्रीच्या दिवशी दुपारी ११.०० वाजता उपस्थित दरपत्रक धारकासमोर उघडणेत येतील. दरपत्रकासाठी आवश्यक कोरे अर्ज व अटी व शर्तीची माहिती, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत, सकाळी ८.०० ते १२.०० व दुपारी २.०० ते ५.०० या वेळेत उपलब्ध होतील. विक्रीसाठी ठेवलेले निरूपयोगी जडवस्तू साहित्य सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष पाहता येईल.

आपला विश्वासू,

कृषिविद्यावेत्ता
प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र
भाटये, रत्नागिरी

**प्रत:** प्रसिध्दीसाठी रवाना

१) मा. संचालक विस्तार शिक्षण,डॉ.बा.सा.को.कृ.वि,दापोली यांना विनंती करण्यात येते की, वरील निविदा विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करून मिळावी.
२) मा. प्रमुख, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र akmudbskkv@gmail.com संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.
३) प्रा. ना. सं. के. भाटये (कार्यालयीन नोटीस बोर्ड)
४) ग्रामपंचायत कार्यालय, भाटये, रत्नागिरी नोटीस बोर्ड.

Scanned with CamScanner

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी

# प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र, भाटये, जि. रत्नागिरी

## प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र, भाटये, जि. रत्नागिरी येथील निरूपयोगी जडवस्तू विक्री बाबतच्या अटी व शर्ती

| | |
|---|---|
| १. | निरूपयोगी जडवस्तू विक्रीबाबतच्या अटी व दरपत्रक भरण्याचे विहीत नमुन्यातील फार्म भरून प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र, भाटये, जि. रत्नागिरी या कार्यालयात सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील. दरपत्रकासोबत दरपत्रक भरणाऱ्यांनी अनामत रक्कम म्हणून रू. १०००/– (रू. एक हजार मात्र) एवढी रक्कम रोखीने भरावयाची आहे. |
| २. | विक्री करावयाच्या जडवस्तू कार्यालयीन वेळेत सकाळी ८.०० ते १२.०० व दुपारी २.०० ते ५.०० या वेळेत प्रत्यक्ष पाहता येतील. |
| ३. | प्रक्षेत्रावरील विक्री करावयाच्या एकूण ११ नग जडवस्तू (विविध योजनेच्या) आहेत. |
| ४. | दरपत्रकधारकांने दरपत्रकात दर्शविलेल्या किमतीशिवाय इतर काही कर असल्यास ते संबंधीत दरपत्रकधारकानेच भरावयाचे आहे. |
| ५. | दरपत्रक सादर करताना दरपत्रकधारकाने घातलेली कोणतीही अट स्विकारली जाणार नाही. |
| ६. | सिलबंद दरपत्रकाच्या पाकिटावर 'निरूपयोगी जडवस्तूसाठी दरपत्रक' असे नमुद करावे. त्याखाली या कार्यालयाचा पत्ता असावा. पाकीटाच्या मागच्या बाजूस दरपत्रकधारकाचे संपूर्ण नांव, पत्ता व मोबाईल क्रमांक लिहावा. तसेच दरपत्रकासोबत आधारकार्ड व पॅनकार्डची छायांकित प्रत जोडण्यात यावी. |
| ७. | दरपत्रके दि. ०५/१२/२०२२ रोजी १०.३० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील आणि प्राप्त दरपत्रके विक्री च्या दिवशी ११.०० वा. उपस्थित दरपत्रकधारकासमोर उघडण्यात येतील. |
| ८. | सिलबंद दरपत्रकांद्वारे वाजवी/अपेक्षीत किंमत न आल्यास दरपत्रक उघडल्यानंतर लगेच उपस्थित दरपत्रक धारकांसमोर वस्तूची विक्री तोंडी बोलीद्वारे करण्याचा हक्क या कार्यालयाने राखून ठेवला आहे. |
| ९. | दरपत्रके उघडल्यानंतर गटनिहाय पहिल्या तीन क्रमांकाच्या दरपत्रकधारकांची अनामत रक्कम राखून ठेवून इतरांच्या रक्कमा त्वरीत परत करण्यात येतील. तसेच उरलेल्या अनामत रक्कम विक्री प्रक्रिया पूर्ण झाल्यावर परत करण्यात येतील. |
| १० | मंजूर दरपत्रक धारकाने निरूपयोगी जडवस्तू नाकारल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. |
| ११. | दरपत्रक मंजूर झाल्यानंतर जडवस्तूची राखण दरपत्रकधारकांनेच करावयाची आहे. |
| १२. | स्वीकृत दरपत्रकात नमुद केलेल्या रक्कमेच्या ५०% रक्कम त्वरीत व ५०% रक्कम वस्तू ताब्यात घेण्यापूर्वी (सुट्टीचे दिवस वगळून) रोखीने भरावी. |
| १३. | एक किंवा सर्वच दरपत्रके तसेच तोंडी बोली कोणतेही कारण न देता नामंजूर करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे. |
| १४. | मंजूर दरपत्रकधारकांने खरेदी केलेल्या जडवस्तू चार दिवसाच्या आत प्रक्षेत्रावरून संबंधीत अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली स्वखर्चाने विहित मुदतीत कार्यालयीन वेळेत घेऊन जाणे बंधनकारक आहे. |

कृषिविद्यावेत्ता
प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र,
भाटये, जि. रत्नागिरी

Scanned with CamScanner